

# मेट्रो-३: आरे कॉलनी ते बीकेसी मार्ग पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पासून सुरु

## मुंबई मेट्रो रेल्वेचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्तांची माहिती

▶मुंबई । कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो रेल्वेचा आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा पुढील वर्षी डिसेंबर २०२३ मध्ये सुरू होईल, तर बीकेसी ते कुलाबा हा दुसरा टप्पा जून २०२४ मध्ये सुरू होईल, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

मुंबई मेट्रो ३ वरील एमआयडीसी स्थानकाच्या कामाच्या पाहणीनंतर एस. के. गुप्ता यांनी या प्रकल्पाची माहिती पत्रकारांना दिली. मेट्रो ३च्या प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१६ मध्ये सुरू झाले. कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो सुरू झाल्यावर मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे. वेळेत आणि इंधनात मोठी बचत होईल. मेट्रोमधून दररोज किमान १७ लाख प्रवासी प्रवास करतील असा अंदाज आहे. एका वेळी २५०० प्रवासी मेट्रोतून प्रवास करतील, अशी माहिती गुप्ता यांनी दिली.